माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२०३८**

**अपिलार्थी श्री. कमलाकर फटकरे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
सक्षम प्राधिकारी (सायन विभाग), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
प्रशासकीय इमारत, ए-विंग, ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
सक्षम प्राधिकारी (सायन विभाग), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
प्रशासकीय इमारत, ए-विंग, ५ वा मजला,अनंत काणेकर मार्ग,
बांद्रा (पूर्व), मुंबई-५१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.१०.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १८.०४.२०२४ | - | २८.०५.२०२४ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०८.०७.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी दि. १८.०४.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(१) "राहत प्लाझा को. ऑ. हौ. सोसायटी (एस.आर.ए.) (२) न्यू सुंदर कमला नगर (एस.आर.ए.) को. ऑ.हौ. सोसायटी, सीटी सर्व्हे नं. ६, पार्ट, सीटी सर्व्हे नं. ७ आणि पार्ट सीटी सर्व्हे नं. ४१ सायन डिव्हीजन, भाऊ दाजी रोड, उत्तर विभाग, या सीटी सर्व्हे नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासाठी विकासकांनी विकास करण्यासाठी आपल्या कार्यालयात अर्जासोबत सोसायटी आणि सभासद यांच्या बरोबर झालेल्या सर्व करारापत्रांची (प्रतिज्ञापत्र) संपूर्ण छायांकीत प्रत मिळणेबाबत. तसेच विकासकांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण करण्यासाठी दिलेल्या परवानगीची संपूर्ण छायांकीत प्रत मिळणेबाबत."*

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. २८.०५.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, त्यांच्याकडे सदर कार्यासनाचा अतिरिक्त कार्यभार कालपासून देण्यात आला आहे व त्यांनी अपिलार्थींना माहिती उपलब्ध करुन देण्यास/ वस्तुस्थिती सादर करण्यासाठी वेळेची मागणी केली.

..२/-

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थींना माहिती उपलब्ध करुन द्यावी व पुढील सुनावणीस अनुपालन अहवालासह उपस्थित रहावे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ३१.१०.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission ★ Greater Mumbai ★

प्रदीप व्यास
16-10-2025

**मुंबई**
**दिनांक : १६.१०.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२०३८**

**अपिलार्थी श्री. कमलाकर फटकरे**

**सुनावणी दिनांक : ३१.१०.२०२५ (In continuation of order dt १६.१०.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थींना माहिती उपलब्ध करुन द्यावी व पुढील सुनावणीस अनुपालन अहवालासह उपस्थित रहावे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणीचे सुनावणी नोटीस/ आदेश काही तांत्रिक अडचणीमुळे अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना निर्गमित झालेले नाहीत. या कारणामुळे अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस उपस्थित राहू शकले नाहीत. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. आयोगाच्या कार्यालयाने पुढील सुनावणीचे आदेश/ सुनावणी नोटीस तात्काळ निर्गमित करावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २७.११.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission
Greater Mumbai

31-10-2025

**मुंबई**
**दिनांक : ३१.१०.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

10 NOV 2025

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२०३८**
**अपिलार्थी श्री. कमलाकर फटकरे**
**सुनावणी दिनांक : २७.११.२०२५ (In continuation of order dt ३१.१०.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आजच्या सुनावणीची सुनावणी नोटीस / आदेश काही तांत्रिक अडचणीमुळे अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना निर्गमित झालेले नाहीत. या कारणामुळे अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस उपस्थित राहू शकले नाहीत. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. आयोगाच्या कार्यालयाने पुढील सुनावणीचे आदेश/ सुनावणी नोटीस तात्काळ निर्गमित करावे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांच्या कार्यालयातील सर्व अभिलेख स्कॅन करुन एकत्र ठिकाणी जतन केला जातो. तरी अपिलार्थीना अपेक्षित असलेली माहिती त्यांच्याकडून मागवून घेण्यासाठी त्यांनी आणखी वेळेची मागणी केली.

जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०८.१२.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : २७.११.२०२५**

27-11-2025
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**